५।१८ २०१६

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समकालीन प्रश्न

संपादक : प्रा. प्रवीण घोडेस्वार



डॉ. विजया विनायक पाटील
२९/०१/२०१८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

आणि

# समकालीन प्रश्न

■

संपादक

प्रा. प्रवीण घोडेस्वार

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# अंतरंग


- कुलगुरूंचे मनोगत/ प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे/७
- संपादकीय/प्रा. प्रवीण घोडेस्वार/११
- **डॉ. आंबेडकरांचे राजकीय चिंतन आणि जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्या**
  १. डॉ. आंबेडकरांचे राजकीय चिंतन आणि जागतिकीकरणाने निर्माण केलेल्या समस्या/ प्रा. डॉ. विशाल लिंगायत/१७
  २. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व दलितांचे राजकीय हक्क/ प्रा. शंकर आवारे/२५
  ३. आंबेडकरवादाचा उदय/प्रा. प्रवीण भागडीकर/३६
- **मूलतत्त्ववादाचा उगम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार**
  १. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार/ डॉ. विजया विनायक पाटील/४५
  २. मूलतत्त्ववादाचा उगम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार/प्रा. डॉ. भगवान माने/५१
  ३. मूलतत्त्ववादाचा उगम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मविषयक विचार/सुरेखा बाबुराव नागरे/६४
  ४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार/ अनिता भास्कर थोरात/७७
- **भारतीय संविधानातील लोककल्याणकारी राज्याची भूमिका आणि जागतिकीकरण**
  १. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भारतीय संविधानातील लोककल्याणकारी राज्याची भूमिका आणि जागतिकीकरण/ डॉ. वामन निंबाजी साळवे/८१

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार

डॉ. विजया विनायक पाटील

## प्रास्तविक

आजकाल धर्मनिरपेक्षता, धर्मातीतता, इत्यादी शब्द प्रयोग फॅशन म्हणून वापरण्याची पद्धती आहे. काही मंडळीना धर्म या शब्दाचा अर्थही माहीत नसतो. कोणाला धर्म म्हणजे पूजा पद्धती वाटत असते. तर कोणाला धर्म म्हणजे विविध कर्मकांडे वाटत असतात. अशा संकुचित किंवा सांप्रदायिक अर्थाने हा धर्म डॉ. आंबेडकरांनीही केलेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनाही दैववाद न शिकविणारा, माणसाला कर्मप्रवण बनविणारा, सामाजिक विषमतेस थारा न देणारा, बुद्धिवादाची कास न सोडणारा धर्म हवा होता. हिंदू धर्म अशा प्रकारच्या रूपात उभा राहू शकणार नाही अशी त्यांची धारणा होती. हिंदू धर्मावर आघात करीत असतानाही धर्माचे महत्त्व डॉ. आंबेडकरांनी जाणले होते. ते मार्क्सप्रमाणे शुद्ध भौतिकवादी किंवा चार्वाकाप्रमाणे नास्तिक नव्हते. माणसाच्या जीवनात धर्म नसेल तर तो पशूच आहे अशी त्यांची स्पष्ट धारणा होती. म्हणून हिंदू धर्मावरील त्यांचा हल्ला मूळ धर्म संकल्पनेवर नसून हिंदुंच्या मूर्खपणाच्या सामाजिक आचारावर होता. दुर्दैवाने अनेक नामवंत हिंदुंनी या आचारांना धर्म मानला व तो समाजावर लादला. डॉ. आंबेडकरांनी या अधर्माचरणावरच हल्ले चढविले आहेत. असे करीत असताना आपले अनुयायी श्रद्धाहीन, अधार्मिक बनू नयेत याचीही त्यांनी मोठी दक्षता घेतली आहे. मनूष्य जीवनांतील धर्माचे स्थान यावर ह्यांनी वेळोवेळी आपले विचार प्रकट केले आहेत. धर्माची आवश्यकता गरिबांना आहे. पीडित लोकांना धर्माची आवश्यकता आहे. गरीब मनूष्य जगतो तो आशेवर. ही आशाच नष्ट झाली तर जीवन कसे होईल? धर्म आशादायी बनवितो व पीडिताना, गरिबांना संदेश देतो. घाबरू